0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.१८/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) मे. आर.आर. ओमरभॉय प्रा.लि. यांचे दि.१८/११/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले निवेदन.
३) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८४/२०११/जा.९४३, दि.२३/११/२०११ व ३०/११/२०११.
४) मे. आर.आर. ओमरभॉय प्रा.लि. यांचे दि.२९/११/२०११ रोजीचे निवेदन.
५) मे. आर.आर. ओमरभॉय प्रा.लि. यांचे दि.०७/१२/२०११ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८४/२०११/जा. १०५०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ३१ /१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १७/११/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि., गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथे विनापरवांना खाद्यतेलाची खरेदी, साठवणूक, विक्री व वितरण होत असल्याने, या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचांसमवेत उक्त ठिकाणच्या गोदामामध्ये प्रवेश केला. तेथे उपस्थित असलेल्या इसमास अधिकाऱ्यांनी त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव प्रविण गुणाजी साळवे असल्याचे सांगून ते तेथे व्यवस्थापक म्हणून काम करीत असल्याचे सांगितले.

सदर कंपनीच्या गोदामामध्ये आढळून आलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत त्याच्याकडे विचारणा केली असता, सदर साठा ए/८, सुपा पारनेर एम.आय.डी.सी., जिल्हा अहमदनगर, पिन क्र. ४१४३०१ व इटली (पत्ता माहित नाही) येथून मागविण्यात येतो. सदर साठवणूक केलेला साठा गोदामातून विविध ब्रॅन्डच्या नावे पॅकिंग करुन विविध मॉलमध्ये मागणी केल्याप्रमाणे पुरवठा करण्यात येतो. पुरवठा करणेसाठी वरील नमूद जागेवरील गोदामामध्ये खाद्यतेलाची साठवणूक केली जाते, असे सांगितले. साठवणूक केलेल्या खाद्यतेलाची

अधिकाऱ्यांनी प्रविण गुणाजी साळवे व पंचासमक्ष मोजदाद केली असता, विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा एकत्रित साठा ६२०.४३ क्विंटल इतका आढळला. त्यापैकी आयात केलेला व त्या अनुषंगाने कंपनीच्या वतीने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे २०८.५३ क्विंटल वजा जाता उर्वरित ४११.९ क्विंटल खाद्यतेलाचा साठा आढळला.

तसेच अधिकाऱ्यांनी शिधावाटप कार्यालयाच्या घाऊक परवान्याबाबत विचारणा केली असता उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या कार्यालयातून देण्यात आलेला घाऊक परवाना क्र. ३७फ/संयुक्त परवाना/७१(घा.)(०९९०) हा दाखविण्यात आला. सदर परवान्याची विधिग्राह्यता दिनांक ३१-१२-२००४ पर्यंत असून सदर परवान्याबाबतच्या नुतनीकरणाची कागदपत्रे व कंपनीची इतर अन्य कागदपत्रे कंपनीचे वकील श्री. सय्यद यांचेकडे असून सदर कंपनीचे भागीदार या कार्यालयास सादर करतील, असे पंचासमक्ष प्रविण गुणाजी साळवे याने सांगितले.

गोदामामध्ये एकूण ४११.९ क्विंटल विविध खाद्यतेलाचा साठा आढळून आला असून तो विहित मर्यादेपेक्षा जास्त आहे. सदर साठ्याबाबत उपस्थित प्रविण गुणाजी साळवे यांनी खरेदी, साठवणूक, विक्री व वितरणाबाबत शिधावाटप प्राधिकरणाकडुन घेण्यात आलेला परवाना दिनांक ३१.१२.२००४ पर्यंत विधिग्राह्य असून सद्यस्थितीत त्यांच्याकडे याबाबत कोणताही परवाना उपलब्ध नसल्याचे दिसून आल्यावरुन त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ व दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसनिंग ऑर्डर, १९९८ चा भंग केलेला आहे. या प्रकरणी मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि., गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॅम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे या कंपनीमध्ये करण्यात आलेल्या विविध खाद्यतेलाच्या साठ्याबाबत अधिक चौकशी होणे आवश्यक असल्याने अधिकाऱ्यांनी गोदामामध्ये आढळून आलेला खाद्यतेलाचा साठा पंचासमक्ष पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत प्रविण गुणाजी साळवे यांना जसा आहे तसाच जतन व सांभाळ करण्याच्या सुचना देऊन त्याबाबतचा सुपूर्दनामा करुन त्यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि., गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे यांनी नमुद पत्यावर मोठया प्रमाणात साठवणूक केलेल्या खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेलाचा ४११.९ क्विं. साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आलेला आहे.

सदर तपासणीच्या वेळेस प्रविण गुणाजी साळवे यांनी मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. या नावे असलेला खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र. ३७फ/संयुक्त परवाना/७१(घा.)(०९९०) अन्वये सादर केलेली छायांकित प्रतीवरुन

सदरचा घाऊक परवाना हा दि.३१/१२/२००४ पर्यंत विधिग्राह्य असल्याचे आढळले. तसेच त्याअनुषंगाने मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. या कंपनीच्या वतीने दि.१८/११/२०११ रोजी टपालामार्फत या कार्यालयास सादर केलेले लेखी निवेदनाचे अवलोकन केले असता, त्यांनी नमूद घाऊक परवानाच्या नुतनीकरणाकरिता दि.१७/११/२०११ या दिवसापर्यंत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या कार्यालयास अर्ज सादर न केल्याचे आढळून आल्याने घटनास्थळी जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा अवैधरित्या व विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर, १९९८ चे कलम ६ (१) अन्वये अनुज्ञप्तीधारकाने त्याना देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीची विधिग्राह्य असलेली मुदत संपण्याच्या अगोदर पुढील नुतनीकरणाकरिता अनुज्ञाप्ती प्राधीकाऱ्याकडे फॉर्म बी मध्ये अर्ज करणे आवश्यक असून त्यासोबत नुतनीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच कलम ६ (२) अन्वये अनुज्ञप्ती प्राधीकाऱ्याने अनुज्ञप्तीधारकास देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीची मुदत संपल्यानंतर अनुज्ञप्तीधारकाने नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येऊ नये, असे नमूद आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २९/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि.२९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस श्री. इस्माईल शकूर कंपनीचे लिगल हेड, श्री. एस.एम.ए. झहीर कंपनीचे इनहाऊस ॲडव्होकेट तसेच कंपनीने प्राधिकृत केलेले ॲड. श्री. सुधीर कोटक यांनी मे. आर.आर. ओमरभॉय प्रा.लि. या कंपनीच्या वतीने वकालतनाम्यासह उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये या अगोदरच टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगून त्यानी वाचावे क्र. ४ अन्वये कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. सुनावणीच्या दरम्यान नमूद जागेचे भाडे करारनामा सादर केले असता, ते माहे मे २०१० पर्यंतच विधिग्राह्य असल्याचे आढळून आले. तसेच खाद्यतेलाच्या विक्री व साठवणूकीकरिता असलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, महानगरपालिकेचा साठवणूकीचा परवाना इत्यादी दस्ताऐवज पुढील सुनावणीस सादर करणार असल्याचे सांगून सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, पुढील तपासणीच्या अनुषंगाने दि.०७/१२/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दि.०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. आर आर. ओमरभॉय प्रा.लि. या कंपनीच्या वतीने त्यांचे इन हाऊस ॲडव्होकेट श्री. एस.एम.ए. झहीर हे सुनावणीच्या वेळी सकाळी ११:३० वाजता उपस्थित राहून सदरची सुनावणी सायंकाळी ०४:३० वाजता ठेवण्याची विनंती केली असता, सदरची सुनावणी स्थगीत करुन सायंकाळी ०४:३० वाजता ठेवण्यात आली. तद्नंतर सायंकाळी ०४:३० वाजता ठेवण्यात आलेल्या सुनावणीस मे. आर आर. ओमरभॉय प्रा.लि. या कंपनीच्या वतीने ॲड. श्री सुधीर कोटक यांनी उपस्थित राहुन वाचावे क्र. ५ अन्वये कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस श्री. इस्माईल शकुर, कंपनीचे लीगल हेड व श्री. एस.एम.ए. झहीर कंपनीचे इन हाऊस ॲडव्होकेट उपस्थित होते.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. आर आर. ओमरभॉय प्रा.लि. यांनी दिनांक १८/११/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, ते खाद्यतेलाचे उत्पादन, विक्रेय उत्पादित वस्तू व विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. दि.१७/११/२०११ रोजीच्या तपासणीमध्ये त्यांच्या नमूद गोदामावरील खाद्यतेलाचा साठ्याची इतंभूत माहिती तपासणी पथकास देण्यात आल्याने त्यांनी सदर खाद्यतेलाच्या साठ्याचे साठेबाजी केलेली नाही. कंपनीकडे संयुक्त घाऊक परवाना क्र. ७१ असून ते अजमितीस नजरचुकीने नुतनीकरण केलेला नाही. मे. आर.आर. ओमरभॉय या कंपनीचे सुपा पारनेर, एम.आय.डी.सी., अहमदनगर येथे खाद्यतेलाचे उत्पादन केले जात असून सदर उत्पादनाच्या ठिकाणी त्यांचेकडे वैध परवाना असल्याचे सांगितले. या सर्व बाबी विचारात घेऊन त्यांचेकडे असलेले परवान्याचे नुतनीकरण करुन न घेतल्याचे त्यांच्याकडून चूक झालेली असून याबाबत खंत व्यक्त करुन सदर बाबतची पुर्तता करुन घेण्यात येईल, असे सांगून त्यांचा नमूद गोदामावरील सुर्पूदनामा करुन जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याचे विक्री करण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती केली.

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. आर आर. ओमरभॉय प्रा.लि. या कंपनीच्या वतीने ॲड. श्री सुधीर कोटक यांनी कंपनीचे लेखी निवेदन सादर करुन युक्तीवाद केला की, तपासणीच्या दिवशी गोदामावर उपस्थित श्री. प्रवीण गुणाजी साळवे यांनी दिलेल्या जबाबाचे आधार घेऊन कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून सदर जबाबामध्ये प्रविण गुणाजी साळवे यांनी जप्त करण्यात आलेला साठा हा विविध मॉल येथे वितरणासाठी ठेवण्यात आल्याचे सांगितले. परंतू कारणे दाखवा नोटीसमध्ये साठेबाजीचा उल्लेख केलेला आहे. ते नमूद गोदामावरुन खाद्यतेलाचा व्यवसाय करीत असून त्यांना दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स

लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ मधील नमूद डिलरची व्याख्या त्यांना लागू होत नसल्याचे सांगितले. तसेच बजावण्यात आलेल्या नोटीसीमध्ये दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ हे आदेश जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ अन्वये निर्गमित केल्याचा उल्लेख नसल्याने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये कार्यवाही करणे योग्य नसल्याचे सांगितले. अहमदनगर येथे खाद्यतेलाचे उत्पादन करीत असून त्यांनी नमूद उत्पादनाच्या ठिकाणी आवश्यक परवाने घेतल्याचे सांगून भिवंडी येथील त्यांच्या नमूद गोदामावरुन साठवणूक केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याची विविध ठिकाणी वाहतूक व वितरण करुन विक्री करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्या भिवंडी येथील गोदामातून खाद्यतेलाची विक्री व व्यवसाय होत असल्याचे सिध्द होत नसून ते सदर गोदामावर खाद्यतेलाची पॅकिंगची प्रक्रिया होत नसून फक्त इम्पोर्टेड ऑईलचे पॅकिंग केले जात आहे. जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याचे त्यांचे उत्पादनाच्या ठिकाणी लेखा नोंद केलेली असून ते परवान्याच्या शर्तीनुसार नियमित विवरणपत्र सादर करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे सदर साठा त्यांचा असून ते कायदेशिर मालक असल्याचे सांगितले. अहमदनगर येथील कंपनीत उत्पादनानंतर सदरचा साठा वितरणाच्या दृष्टीने सोयीस्कर व्हावे म्हणून भिवंडी येथे साठवणूक करीत असून विक्री करीत नसल्याचे सांगितले. कंपनीचे लेखा पुस्तक व इतर दस्ताऐवज गरज पडेल तेव्हा सादर करण्यास तयार असून खाद्यतेलाची ठराविक किमत अभावी सदरचा साठा साठेबाजी तसेच गैरव्यवहाराच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे सांगता येणार नाही. सदर खाद्यतेलाचा साठा हा साठेबाजी तसेच गैरव्यवहाराच्या दृष्टीने साठवणूक केल्याचे सिध्द होत नाही. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कोणत्याही आदेशाचे भंग केले नसून त्यांनी नमूद गोदामावर खाद्यतेलाचे साठवणूक केल्याचा स्पष्ट नकार दिला. त्यामुळे त्यांचा खाद्यतेलाचा साठा जप्त करु शकत नसल्याचे सांगितले. प्रस्तूत प्रकरणी कोणतेही निष्कर्ष काढण्याच्या अगोदर त्यांच्याकडे परवाना असल्याची बाब विचारात घेण्यात यावी. खाद्यतेलावरील निर्बंध काढण्यात आल्याने त्यांनी सन २००४ नंतर त्यांचेकडील घाऊक परवान्याचे नुतनीकरण केलेले नसून ते डिलरच्या व्याख्येमधील विक्रीची प्रक्रिया करीत नसल्याने त्यांना नमूद परवान्याची गरज नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्याकडे परवाना आहे. परंतू नुतनीकरण केलेला नाही, असे सांगून त्यांना विनापरवाना म्हणून गृहित धरण्यात येऊ नये. अहमदनगर येथील उत्पादनाच्या ठिकाणा व्यतिरिक्त भिवंडी येथील गोदाम हे व्यवसयासाठी अतिरिक्त ठिकाण असल्याचे सांगितले. कंपनीचे विरोधात अभिकथन करण्यापूर्वी त्यांच्याकडून तांत्रिक अनियमितता झाल्यामुळे सदर साठ्याची जप्ती केल्यास जीवनावश्यक वस्तू कायद्याचे उद्देश साध्य होणार नसल्याचे सांगितले. यामुळे हेतूपुरस्सर गैरकृत्य केल्याचे कागदोपत्री सिध्द होत नसून त्यांच्याकडून याबाबतीत फक्त निष्काळजीपणा झालेला आहे. कंपनीने यापूर्वी जीवनावश्यक वस्तू कायद्याचा कधीही भंग केलेला नाही. त्यांच्या खाद्यतेलाच्या

साठ्याच्या जप्तीची ही पहिली वेळ आहे. सदर जप्तीची कार्यवाही रद्द करुन त्यांचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा बंधपत्रावर मुक्त करण्यास विनंती केली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. आर.आर. ओमरभॉय प्रा.लि. या कंपनीच्या वतीने ॲड. श्री सुधीर कोटक यांनी कंपनीचे लेखी निवेदन सादर करुन युक्तीवाद केला की, त्यांना बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मिळाली असून नमूद गोदामावर ते इम्पोर्टेड ऑईलचे पॅकिंग व फिलिंगची प्रक्रिया करीत असून त्यांचेकडे अन्न व औषध प्रशासनाचा परवाना आहे. अहमदनगर येथे ते खाद्यतेलाचे उत्पादन करीत असून त्यानुसार त्यांनी काल्हेर, भिवंडी येथील गोदामावर फुड सेफ्टी अँण्ड स्टॅन्डर्ड ॲक्टच्या परवान्यासाठी अर्ज केलेला आहे. यापूर्वीच्या सुनावणीस आवश्यक कागदपत्रे सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितल्याने, नमूद गोदामाचे मेन्टेनन्स बिल ते सादर करीत असून गोदामाचा वैध असलेला भाडे करारनामा नंतर सादर करणार असल्याचे सांगून आजमितीस सदरचे गोदाम त्यांच्या ताब्यात असल्याचे सांगितले. सदरचे सर्व दस्ताऐवजाची काय आवश्यकता आहे, असे सांगून त्यांच्याकडून जास्तीत जास्त माहिती घेत असल्याचे सांगितले. सदर गोदामावर ते विक्री व खरेदीची प्रक्रिया करीत नसल्याने त्यांना दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल लायसनन्सिग ऑर्डर, १९९८ चे कलम २(ई) मधील डिलरची नमूद व्याख्या त्यांना लागू होत नसल्याचे सांगितले. सदर आदेशाचे कलम १२ (२)(ii) अन्वये केल्यानुसार परवानाधारक त्याच्या परवान्याची मुदत संपल्यानंतर नुतनीकरणसाठी अर्ज न करता घाऊक व्यवसाय करीत असेल तर त्याचा परवानाकरीता जमा असलेले अनामत रक्कम जप्त करुन अथवा परवाना निलंबित करण्याचे लेखी आदेश निर्गमित करावे परंतु तत्पुर्वी परवानाधारकास त्याचे म्हणणे मांडण्यासाठी त्यास संधी देण्यात यावी. तद्नंतरच प्रकरणाच्या गुणवत्तेनुसारच सदरचा परवाना रद्द अथवा निलंबित करण्यात यावा असे नमुद असल्याने त्यांनाही उपरोक्त नमुद बाबत संधी देण्यात यावी असे नमुद केले आहे. प्रस्तुत प्रकरणी त्यांचेकडे सन २००४ पर्यंत परवाना असल्याचे तसेच त्यांनी त्यानंतरच्या कालावधीकरीता नुतणीकरण करुन न घेतल्याचे निर्विवादीत असुनही अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी या कारणामुळे त्यांचा परवाना निलंबित अथवा रद्द केलेला नाही त्यामुळे त्यांना आज रोजी विनापरवाना म्हणून संबोधण्यात येवू नये असे नमुद करुन जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये होणारी जप्तीची कारवाई रद्द करुन जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा अंतरीम बंधपत्रावर त्यांना परत करण्याची विनंती केली.

**<u>निष्कर्ष</u> :-**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १७/११/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि., गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथे विनापरवाना खाद्यतेलाची खरेदी, साठवणूक, विक्री व वितरण होत असल्याने, या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचासमवेत उक्त ठिकाणच्या गोदामामध्ये प्रवेश उपस्थित प्रविण गुणाजी साळवे, व्यवस्थापक यास सदर कंपनीच्या गोदामामध्ये आढळून आलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत विचारणा केली असता, सदर साठा अे/८, सुपा पारनेर एम.आय.डी.सी., जिल्हा अहमदनगर, पिन क्र. ४१४३०१ व इटली येथून मागविण्यात येतो. सदर साठवणूक केलेला साठा गोदामातून विविध ब्रॅन्डच्या नावे पॅकिंग करुन विविध मॉलमध्ये मागणी केल्याप्रमाणे पुरवठा करण्यात येतो. पुरवठा करणेसाठी वरील नमूद जागेवरील गोदामामध्ये खाद्यतेलाची साठवणूक केली जाते, असे सांगितले. साठवणूक केलेल्या खाद्यतेलाची अधिकाऱ्यांनी प्रविण गुणाजी साळवे व पचासमक्ष मोजदाद केली असता, विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा एकत्रित साठा ६२०.४३ क्विंटल इतका आढळला. त्यापैकी आयात केलेला अंतीम उत्पादित ऑलिव ऑईलच्या साठ्याच्या अनुषंगाने कंपनीच्या वतीने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे २०८.५३ क्विंटल वजा जाता उर्वरित ४११.९ क्विंटल खाद्यतेलाचा साठा आढळला. तसेच अधिकाऱ्यांनी शिधावाटप कार्यालयाच्या घाऊक परवान्याबाबत विचारणा केली असता उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या कार्यालयातून देण्यात आलेला घाऊक परवाना क्र. ३७फ/संयुक्त परवाना/७१(घा.)(०९९०) हा दाखविण्यात आला. सदर परवान्याची विधिग्राह्यता दिनांक ३१.१२.२००४ पर्यंत असून सदर परवान्याबाबतच्या नुतनीकरणाची कागदपत्रे व कंपनीची इतर अन्य कागदपत्रे कंपनीचे वकील श्री. सय्यद यांचेकडे असून सदर कंपनीचे भागीदार या कार्यालयास सादर करतील, असे पंचासमक्ष प्रविण गुणाजी साळवे याने सांगितले.

गोदामामध्ये एकूण ४११.९ क्विंटल विविध खाद्यतेलाचा साठा आढळून आला असून तो विहित मर्यादेपेक्षा जास्त आहे. सदर साठ्याबाबत उपस्थित प्रविण गुणाजी साळवे यांनी खरेदी, साठवणूक, विक्री व वितरणाबाबत शिधावाटप प्राधिकरणाकडुन घेण्यात आलेला परवाना दिनांक ३१.१२.२००४ पर्यंत विधिग्राह्य असून सद्यस्थितीत त्यांच्याकडे याबाबत कोणताही परवाना उपलब्ध नसल्याचे दिसून आल्यावरुन त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ व दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसनिंग ऑर्डर, १९९८ चा भंग केलेला आहे. या प्रकरणी मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि., गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॅम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे या कंपनीमध्ये करण्यात आलेल्या विविध खाद्यतेलाच्या साठ्याबाबत अधिक चौकशी होणे आवश्यक असल्याने अधिकाऱ्यांनी गोदामामध्ये आढळून आलेला खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि

0007

महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेलाचा ४११.९ क्विं. साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आला व तसा लेखी जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

सदर तपासणीच्या वेळेस प्रविण गुणाजी साळवे यांनी मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. या नावे असलेला खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र. ३७फ/संयुक्त परवाना/७१(घा.)(०९९०) अन्वये सादर केलेली छायांकित प्रतीवरुन सदरचा घाऊक परवाना हा दि.३१/१२/२००४ पर्यंत विधिग्राह्य असल्याचे आढळले. तसेच त्याअनुषंगाने मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. या कंपनीच्या वतीने दि.१८/११/२०११ रोजी टपालामार्फत या कार्यालयास सादर केलेले लेखी निवेदनाचे अवलोकन केले असता, त्यांनी नमूद घाऊक परवानाच्या नुतनीकरणाकरिता दि.१७/११/२०११ या तपासणीच्या दिवसापर्यंत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या कार्यालयास अर्ज सादर न केल्याचे आढळून आल्याने घटनास्थळी जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा अवैधरित्या व विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

मे. आर आर. ओमरभॉय प्रा.लि. यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते खाद्यतेलाचे उत्पादन, विक्रेय उत्पादित वस्तू व विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. कंपनीकडे संयुक्त घाऊक परवाना क्र. ७१ असून ते अजमितीस नजरचुकीने नुतनीकरण केलेला नाही. तसेच त्यांचेकडे असलेले परवान्याचे नुतनीकरण करुन न घेतल्याचे त्यांच्याकडून चूक झालेली असून याबाबत खंत व्यक्त करुन सदर बाबतची पुर्तता करुन घेण्यात येईल, असे सांगीतले. ते नमूद गोदामावरुन खाद्यतेलाचा व्यवसाय करीत असून त्यांना दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सिग ऑर्डर, १९९८ मधील नमूद डिलरची व्याख्या त्यांना लागू होत नसल्याचे सांगितले. अहमदनगर येथे ते खाद्यतेलाचे उत्पादन करीत असून त्यांनी नमूद उत्पादनाच्या ठिकाणी आवश्यक परवाने घेतल्याचे सांगून भिवंडी येथील त्यांच्या नमूद गोदामावरुन साठवणूक केलेल्या खाद्यतेलाच्या सांठ्याची विविध ठिकाणी वाहतूक व वितरण करुन विक्री करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्या भिवंडी येथील गोदामातून खाद्यतेलाची विक्री व व्यवसाय होत असल्याचे सिध्द होत नसून ते सदर गोदामावर खाद्यतेलाची पॅकिंगची प्रक्रिया होत नसून फक्त इम्पोंटेड ऑईलचे पॅकिंग केले जात आहे. अहमदनगर येथील कंपनीत उत्पादनानंतर सदरचा साठा वितरणाच्या दृष्टीने सोयीस्कर व्हावे म्हणून भिवंडी येथे साठवणूक करीत असून विक्री करीत नसल्याचे सांगितले. सदर खाद्यतेलाचा साठा हा साठेबाजी तसेच गैरव्यवहाराच्या दृष्टीने साठवणूक केल्याचे सिध्द होत नाही. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कोणत्याही आदेशाचा त्यांनी भंग केला नसून नमूद गोदामावर खाद्यतेलाचे साठवणूक केल्याचा स्पष्ट नकार दिला. खाद्यतेलावरील निर्बंध काढण्यात आल्याने त्यांनी सन २००४ नंतर

त्यांचेकडील घाऊक परवान्याचे नुतनीकरण केलेले नसून ते डिलरच्या व्याख्येमधील विक्रीची प्रक्रिया करीत नसल्याने त्यांना नमूद परवान्याची गरज नसल्याचे सांगितले. त्यापुढे त्यांच्याकडे परवाना आहे. परंतू नुतनीकरण केलेला नाही, असे सांगून त्यांना विनापरवाना म्हणून गृहित धरण्यात येऊ नये असे सांगीतले. तसेच सदर गोदामावर ते विक्री व खरेदीची प्रक्रिया करीत नसल्याने त्यांना दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल लायसनन्सिग ऑर्डर, १९९८ चे कलम २(ई) मधील डिलरची नमूद व्याख्या त्याना लागू होत नसल्याचे सांगितले. तसेच त्यांना आज रोजी विनापरवाना म्हणून संबोधण्यात येवू नये असे नमुद करुन जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६ अ अन्वये होणारी जप्तीची कारवाई रद्द करुन जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा अंतरीम बंधपत्रावर त्यांना परत करण्याची विनंती केली.

वरील सर्व बाबी विचारात घेता त्यांचे निवेदन हे विसंगत असुन ते शासनाची दिशाभुल करीत असल्याचे दिसुन येत आहे तसेच त्यांना देण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या घाऊक परवान्याची सन २००४ साली वैधता संपुष्टात आल्यानंतर त्यांनी जाणुनबुजुन सदर परवान्याच्या नुतणीकरणासाठी संबधीत अनुज्ञप्ती प्राधिका-यांकडे अर्ज सादर न केल्याचे व टाळाटाळ केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सीग ऑर्डर, १९९८ चे कलम ६ (१) अन्वये अनुज्ञप्तीधारकाने त्यांना देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीची विधिग्राह्य असलेली मुदत संपण्याच्या अगोदर पुढील नुतनीकरणाकरिता अनुज्ञप्ती प्राधीकाऱ्याकडे फॉर्म बी मध्ये अर्ज करणे आवश्यक असून त्यासोबत नुतनीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच कलम ६ (२) अन्वये अनुज्ञप्ती प्राधीकाऱ्याने अनुज्ञप्तीधारकास देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीची मुदत संपल्यानंतर अनुज्ञप्तीधारकाने नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येऊ नये, असे नमूद आहे.

केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. २२२७(अ) दिनांक २७/०९/२०११ अन्वये खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या व्यापारावर वेळोवेळी मुदतवाढ देवून दिनांक ३०/९/२०१२ पर्यंत निर्बंध आणलेले आहेत. दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ अन्वये तांदूळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल/वनस्पती, खाद्यतेल बिया यांचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांकडे वैध परवाना असणेही क्रमप्राप्त आहे.

ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.१६/०६/२००३ रोजी पारीत केलेले आदेश क्र. जीएसआर/४९०(ई) अन्वये डिलरची व्याख्या " Dealer means any person engaged in the business of purchase, movement, sale, supply, distribution or storage for sale of any of the commodities specified in clause ३ whether as a wholesaler or retailer or

producer or manufacturer or exporter or importer and whether or not in conjunction with any other business and includes his representative or agent but does not include a producer or manufacturer or importer or exporter of sugar." म्हणजेच साखरेचे उत्पादक, आयातदार व निर्यातदार वगळता इतर अनुसुचीत वस्तुच्या आयातदार, निर्यातदार व इतर सर्वांना डिलरच्या व्याख्येतुन सुट देण्यात आलेली नाही हे स्पष्ट होत आहे.

" महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१० " अन्वये महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर ठिकाणी घाऊक परवानाधारकास खाद्यतेलाच्या साठवणूकीकरिता विहित कमाल मर्यादा ३०० क्विंटल आहे.

प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायत काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे यांचेकडे याबाबत खातरजमा करण्याकरीता विचारणा केली असता त्यांनी दि.२०/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि., गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॅम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे हे भिवंडी निजामपूर महानगर पालिका महसूली हद्दीत येत नसून ग्रामपंचायत काल्हेर यांच्या महसूली हद्दीत येत असल्याचे कळविले आहे. सबब, मे. आर. आर. ओमरभॉय प्रा.लि. यांच्याकडे वैध परवाना असता तरीही त्यांनी नमुद गोदामावरील साठवणूक केलेला खाद्यतेलाचा ४११.९ क्विंटल साठयापैकी १११.९ क्विंटल साठा हा विहित कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळून आला असता.

दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडीटीज होलसेल डिलर लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये खाद्यतेल/वनस्पतीच्या खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता मे. आर.आर. ओमरभॉय प्रा.लि. या कंपनीच्या नावे सुपा, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर या त्यांच्या उत्पादनाच्या ठिकाणी त्यांनी खाद्यतेल उत्पादक म्हणून मिलर्सकरिता असलेला परवाना क्र. ३/२००८ तहसिलदार पारनेर यांचेकडून प्राप्त करुन घेतले आहे. तथापि, नमुद गोदामावर त्यांना प्राप्त घाऊक परवान्याचे त्यांनी नुतणीकरण करुन घेतला नसल्याचे तसेच त्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडे तपासणीचे दिवसापर्यंत अर्जही केला नसल्याचे आढळून आल्याने तसेच त्यांना त्यांचेकडील मुदतबाहय व अवैध असलेला परवाना नुतणीकरणासाठी स्वारस्यही नसल्याचे दिसुन येत असल्याने सदरचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा संपुर्ण ४११.९ क्विंटल साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे निष्पण्ण होत आहे.

सबब, मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. यांनी यांचे गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे या नमुद गोदामावर दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये साठवणूकीचा वैध परवाना नसल्याने तसेच घाऊक परवान्याची सन २००४ साली वैधता संपुष्टात आल्यानंतरही त्यांनी जाणुनबुजुन सदर परवान्याच्या

नुतणीकरणासाठी संबंधीत अनुज्ञाप्ती प्राधिका-यांकडे अर्ज सादर न केल्याचे व टाळाटाळ केल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने सदरचा संपूर्ण खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३, ४, ५, ६, ७, ८ व ९ तसेच जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० चा भंग केल्याचे पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. यांचेविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ा १०७/२०११ दिनाक १४/१२/२०११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सबब, मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. यांनी यांचे गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथे साठवणूक केलेल्या खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तुचा विनापरवाना साठवणूक केलेला खाद्यतेलाचा संपूर्ण ४११.९० क्विंटल साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ा १०७/२०११ दिनाक ०२/१२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तुत प्रकरणी मे. आर.आर. ओमरभॉय प्रा. लि. यांचे गाळा क्र. जे. १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्प्लेक्स, दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे या पत्त्यावरील नमुद गोदामा मधील जप्त करण्यात आलेला संपूर्ण ४११.९० क्विंटल खाद्यतेलाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary,

Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. आर आर ओमरमॉय प्रा. लि.,
गाळा क्र. जे १०-१३, राजलक्ष्मी कमर्शिय कॉम्प्लेक्स,
दुर्गेश पार्क समोर, काल्हेर गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी याना कळविण्यात येते की, सदरचे आदेश सबधीतावर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच जप्त करण्यात आलेले खाद्यतेलचा साठा हा नाशवत असल्याने आदेशाची तात्काळ अमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ याना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्याना कळविण्यात येते की, आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे कार्यवाही करण्याकरिता पोलिसाना आवश्यक ती मदत करावी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.